**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – रोहिदास गंगाधर पवार

माझे वय ५५ वर्षे व्यवसाय शेती

राहणार आंभोळ, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत–</u>**

**१.** दिनांक १०.०१.२०१९ रोजी मी माझ्या कामानिमित्त अकोले पोलीस ठाणे येथे गेलो असताना पोलिसांनी तयार पंचनाम्यावर माझी सही घेतली. पोलिसांनी माझ्यासमोर कोणताही पंचनामा केलेला नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावरील अ.क्र.२ वरील सही माझीच आहे. ती सही मी ओळखतो. परंतु, पंचनाम्यातील मजकूर मला माहित नाही. त्या पंचनाम्यावरील सहीला **<u>निशाणी पी–२०</u>** देण्यात आली.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने सहा. सरकारी वकील यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना साक्षीदारास उलटतपासामध्ये विचारतात त्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.)**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.०१.२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजताचे सुमारास सहाय्यक पोलीस फौजदार श्री.एस.आर.साळवे यांनी मला कोतुळ ते आंभोळ जाणारे डांबरी रस्त्यावर आंभोळ गावचे शिवारामध्ये पंचनाम्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझेसोबत महेंद्र अर्जुन साबळे हे पंच म्हणून हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, ते घटनास्थळ कोतुळ ते आंभोळ जाणारे डांबरी रस्त्यावर देवीवाडी रस्त्याकडे जाणा–या डांबरी रोडवर होते. हे म्हणणे खरे नाही की, ते घटनास्थळ फिर्यादी अजय सुदाम चौधरी यांनी

दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझेसमोर घटनास्थळाचा दिसत्या परिस्थितीनुसार पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तो पंचनामा मला वाचून दाखवून त्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा माझ्या चांगल्या ओळखीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होऊ नये म्हणून मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.टी.एस.फापाळे यांचेतर्फे उलटतपास–</u>**

३. नाकारला.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.10 15:08:48 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**दिनांक – ०९.०३.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**